इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे/नंदुरबार आवृत्ती । शुक्रवार, दि.२६ सप्टेंबर २०२५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

संपादकीय

आधी केले मग सांगितले

सामान्यतः एरवी मोठ्या वयाच्या माणसांचे आरोग्य चर्चेच्या आणि विविध सर्वेक्षणांच्या केंद्रस्थानी असते. तथापि लहान मुलांमधील वाढत्या अनारोग्याकडे राज्याच्या आरोग्य विभागाच्या सचिवांनी लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न नुकताच केला. लहान व अल्पवयीन मुलांमध्ये असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण चिंताजनक वाढत असल्याचे त्यांचे निरीक्षण आहे. मधुमेह, स्थूलता, दमा, जन्मजात हृदयरोग, सिकलसेल अशा दुर्धर व्याधींचा अकाली संसर्ग झालेल्या बालकांची राज्यातील संख्या सुमारे साठ लाख असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. युनिसेफचा अहवालदेखील मुलांमधील लठ्ठपणा अधोरेखित करतो. वाढत्या लठ्ठपणामुळे उपरोक्त व्याधी संसर्गाची जोखीम कैकपटीने वाढते असा निष्कर्ष त्या अहवालात नमूद असल्याचे प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. लहान बालकांमधील अस्वास्थ्य त्यांच्यासह कुटुंबाच्या मानसिक आणि आर्थिक स्वास्थ्यावर दीर्घकालीन परिणाम करते. मुलांचे आजारपण हा बहुसंख्य कुटुंबातील भावनिक मुद्दाही बनतो. असे होणे त्या कुटुंबासाठी निराशाजनक असते. मुले सारखी आजारी पडू नयेत, त्यांना दीर्घ व्याधींनी ग्रासू नये अशीच तमाम पालकांची इच्छा असते. त्यासाठी प्रयत्न करणे त्यांच्याही हातात असते. मुलांना अकाली अशा व्याधी का गाठतात? याचा शोध घेतला तर अनेक कारणे सापडू पान २ वर

केळी भाव

नवती (१) : 1325
नवती (२) : 1125

मिस्किली

दोघांकडे पालकत्व तरी बुलडाणा अनाथ!

मकरंद पाटील, सावकारेंविरोधात पोलिसात तक्रार

बुलडाणा । राज्यात पावसाने थैमान घातले आहे.मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्री राज्यभरात दौरा करीत असताना बुलडाणा जिल्ह्याचे दोन्ही पालकमंत्री मात्र जिल्ह्यात फिरकले नसल्याने पालकमंत्री मकरंद पाटील व सहपालकमंत्री संजय सावकारे हरवले असून त्यांच्या विरुध्द पोलीस स्टेशनला मिसिंगची तक्रार शरद पवार गटाच्या वतीने करण्यात आली आहे.तक्रारीत म्हटले आहे की जिल्ह्याला २ पालकमंत्री असूनही अतिवृष्टीत जिल्हा अनाथ झाला आहे. जिल्ह्यातील सिंदखेड राजा आणि परिसरात ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने शेतीचे मोठं नुकसान झाले आहे

महाराष्ट्र सह बुलडाणा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात ढगफुटी झाली. त्यामुळे हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. शेतकरी पूर्णतः खचून गेला आहे.

शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने तात्काळ मदतीची गरज असतांना बुलडाणा जिल्ह्याला २ पालकमंत्री आहेत. मात्र त्यातील एकही पालकमंत्री अजूनही जिल्ह्यात दाखल झाला नाही. त्यामुळे दोन्ही पालकमंत्री हरवल्याची तक्रार पोलिसात देण्यात आली असून त्यांना शोधून देण्याची मागणी बुलडाणा शरदचंद्र पवार राष्ट्रवादी पक्षाने केली आहे.

बुलडाणा जिल्ह्यात दुसरबीड आणि सोनोशी महसूल मंडळात झालेल्या ढगफुटीने शेतकऱ्यांचे अक्षरश कंबरडे मोडले आहे. होत्याचे नव्हते झाले आहे. नदी काठावरील शेती तर खरडून गेलीय. उभी पीक पाण्यात वाहून गेल्याने सिंदखेड राजा तालुक्यातील सोनोशी, वर्दाडी, गारखेड, रुम्हनासह परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतात आजही पाणी असून पीक सडत आहेत. सरकारने जी मदत जाहीर केली ती अतिशय तुटपुंजी असून जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे, हेक्टरी ५० हजार मदत करावी, मागील पिक विमा तत्काळ द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

सरसकट कर्जमाफी करा!

उद्धव ठाकरेंचा सरकारला इशारा

लातूर । अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या अश्रूंचा बांध फुटलाय. मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक कणा मोडलाय शेतकरी पुरता हतबल झालाय. त्यामुळे उद्धव ठाकरेंनी थेट बांधावर जात शेतक-यांना आधार दिलाय. सरकारने शेतक-यांसाठी केलेल्या मदतीवरून देखील उद्धव ठाकरेंनी हल्लाबोल केलाय. पंचांग पाहून शेतकऱ्यांना मदत करणार का? सरसकट कर्जमाफी करा अन्यथा शिवसेना शेतक-यांसोबत रस्त्यावर उतरणार असा इशारा उद्धव ठाकरेंनी दिलाय.

हेक्टरी ५० हजारांच्या मदतीसाठी आवाज उठवणार असा शब्द उद्धव ठाकरेंनी पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिलाय. तुमचा आवाज सरकारपर्यंत पोहोचवणार असल्याचेही ठाकरेंनी सांगितलंय. पूरग्रस्तांनी खचून जाऊ नये असे आवाहन उद्धव ठाकरेंनी केलंय. लातूरचा दौरा करत ठाकरेंनी शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्यात.

सरकारला शेतकऱ्यांवर अन्याय करू देणार नसल्याचेही उद्धव ठाकरेंनी म्हटलेय. आम्हाला मदतीवरून राजकारण करायचे नाही मात्र, मराठवाड्यातील परिस्थिती भीषण असून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत करावी अशी मागणीही यावेळी ठाकरेंनी केलीय. धाराशिवमध्ये देखील पावसाचा हाहाकार पाहायला मिळाला. पुराचे पाणी घरात शिरल्यामुळे घरांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालंय. अन्नधान्य पाण्याखाली गेलंय तसंच घरातील साहित्यांचं देखील मोठं नुकसान झालंय.

टपाली मतपत्रिकांच्या मोजणी प्रक्रियेत सुधारणा

मुंबई । निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने टपाली मतपत्रिकांच्या मोजणीची प्रक्रिया अधिक सुलभ आणि स्पष्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ईव्हीएम/व्हीव्हीपॅटच्या मोजणीतील शेवटून दुसरी फेरी टपाल मतपत्रिकांची मोजणी पूर्ण झाल्यानंतरच सुरू केली जाणार आहे.

मतपत्रिका / इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील टपाल मतपत्रिका यांची मोजणी आणि ईव्हीएमद्वारे मोजणी हया आयोगाच्या मतमोजणी प्रक्रियेतील दोन प्रमुख टप्पे आहेत. मतमोजणीच्या दिवशी सकाळी आठ वाजता टपाली मतपत्रिकांची मोजणी सुरू होते. तर सकाळी साडेआठ

वाजल्यापासून ईव्हीएमची मोजणी सुरू होते. पूर्वीच्या निर्देशांनुसार, ईव्हीएमची मोजणी टपाली मतपत्रिकांच्या मोजणीपासून स्वतंत्रपणे सुरू राहू शकत होती. त्यामुळे काहीवेळा ईव्हीएमची मोजणी टपाल मतपत्रिकांपूर्वी पूर्ण होण्याची शक्यता निर्माण होत असे.

अलीकडेच दिव्यांग मतदार तसेच ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना घरबसल्या मतदानाची सोय उपलब्ध करून दिल्यामुळे टपाली मतपत्रिकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे संपूर्ण प्रक्रियेत सुसंगती आणि स्पष्टता राखण्यासाठी आयोगाने टपाली मतपत्रिकांच्या मोजणी प्रक्रियेत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.

याशिवाय, ज्या मतदारसंघांमध्ये टपाल मतपत्रिकांची संख्या मोठी आहे, तिथे पुरेशा संख्येने टेबल्स आणि मोजणी कर्मचारी उपलब्ध करून देण्याचे निर्देश आयोगाने संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे मतमोजणीची गती आणि पारदर्शकता कायम राहील, असे निवडणूक आयोगाने प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

भाजपा १२ मंत्र्यांना नारळ देण्याच्या तयारीत

अहमदाबाद । भारतीय जनता पक्ष आपल्या सगळ्यात मजबूत बालेकिल्ल्यात दिवाळीच्या आधी मोठे राजकीय फेरबदल करण्याच्या तयारीत आहे. गुजरात सरकारमध्ये येत्या काही दिवसात महत्त्वाचे बदल दिसू शकतात. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि चार मंत्री वगळता सरकारमधील अन्य मंत्री बदलले जाऊ शकतात.

गुजरातमध्ये लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. महानगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणुका येत्या काही महिन्यांत होऊ शकतात. गुजरात सरकारमध्ये मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांना धरुन १७ मंत्री आहेत. यातील १० ते १२ जणांना डच्चू मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

लातूर । राज्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक गावांना पुराने वेढा घातलेला आहे. शेतीचे प्रचंड नुकसान झालेले आहे. मुख्यमंत्र्यांसह दोन्ही उपमुख्यमंत्री पाहणी करीत आहेत.

प्रसाद पुरोहित कर्नलपदी

मुंबई । मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. यानंतर आता लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांना कर्नल पदावर बढती देण्यात आली आहे. २००८ च्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात विशेष एनआयए न्यायालयाने दिलेल्या आदेशात एक महत्त्वाचा आणि महत्त्वाचा खुलासा झाला. न्यायालयाने म्हटले आहे की, या प्रकरणात आरोपी असलेले लेफ्टनंट कर्नल प्रसाद श्रीकांत पुरोहित यांच्या निवासस्थान ए-९ मध्ये कोणतेही आरडीएक्स, स्फोटक पदार्थ किंवा संशयास्पद बॉम्ब बनवण्याच्या वस्तू सापडल्या नाहीत. आता यानंतर प्रसाद पुरोहित यांना कर्नल या पदावर बढती देण्यात आली आहे. प्रसाद पुरोहित ९ वर्षे तुरुंगात होते २००८ च्या मालेगाव बॉम्बस्फोटात सहा जणांचा मृत्यू झाला आणि १०० हून अधिक जण जखमी झाले होते. प्रसाद पुरोहित यांनी या स्फोट प्रकरणात नऊ वर्षे तुरुंगवास भोगला आहे. पुरोहित यांनी सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद केला की त्यांना राजकीयदृष्ट्या अडकवण्यात आले. प्रसाद पुरोहित हे १९९४ मध्ये मराठा लाईट इन्फंट्रीमध्ये सामील झाले होते.

आ.खडसेंच्या जावयाला जामीन

प्रांजल खेवलकर आज कारागृहातून बाहेर येणार

पुणे । माजी मंत्री आ.एकनाथराव खडसे यांचे जावई प्रांजल खेवलकरांना पुण्यातील खराडी भागातील रेव्ह पार्टी करताना पोलिसांनी रंगेहात पकडले आणि राज्यातील राजकारणात मोठी खळबळ उडाली. यानंतर काही गंभीर आरोप हे खेवलकर यांच्यावर करण्यात आली. अनेक महिलांचे त्यांच्या मोबाईलमध्ये अश्लील व्हिडीओ सापडल्याचा दावा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी केला. पतीवर झालेल्या गंभीर आरोपांनंतर रोहिणी खडसे या पतीसाठी मैदानात उतरल्याचे बघायला मिळाले. त्यांनतर अनेक दिवस हा विषय चर्चेत राहिला.शेवटी गुरुवार दि.२५ रोजी न्यायालयाने प्राजंल खेवलकर यांना जामीन मंजुर केल्याने उद्या शुक्रवारी ते कारागृहाबाहेर येणार आहे.

पतीसाठी कोर्टात कोट घालून रोहिणी खडसे दिसल्या. योग्यवेळी मी सर्व गोष्टींवर उत्तरे देईल, असे त्यांनी स्पष्ट केले. आता रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकरला दिलासा मिळाला आहे. काही महिन्यानंतर कोर्टाने खेवलकरचा जामीन अखेर मंजूर केलाय. जावयाला अटक झाल्यानंतर एकनाथराव खडसे यांनीही काही गंभीर आरोप केले होते. मात्र, त्यांनी हे देखील स्पष्ट केले की, मी जावयाचे समर्थन करणार नाही, जर तो चुकीचा असेल तर त्याला शिक्षा झालीच पाहिजे परंतु केवळ राजकीय हेतूने आरोप होत असतील तर त्याची देखील चौकशी झाली पाहीजे.

पतीला अटक झाल्यानंतर रोहिणी खडसे यांनी शरद पवार यांचीही पुण्यात भेट घेतली होती. सुप्रिया सुळे यांनी रोहिणी खडसे यांच्या समर्थनार्थ एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली होती. पतीला जामीन मिळाल्यानंतर रोहिणी खडसे या प्रकरणावर काही भाष्य करणार का? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले.

अमळनेरात अपघातात दोन ठार, एक जखमी

अमळनेर । हेडावे रस्त्यावर आयशर गाडी आणि दोन मोटरसायकल अपघातात पती पत्नी जागीच ठार झाली असून एक जण जखमी झाला आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की २५ रोजी संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास हेडावे रस्त्यावर दोन मोटारसायकल आणि आयशर अशा तिहेरी अपघात एकरूखी येथील विश्वनाथ हिंमत भिल वय ३० आणि ज्योती विश्वनाथ भिल वय २५ हे जागीच ठार झाले असून दुसरा मोटारसायकल चालक बाळू साहेबराव पाटील ५० हा जबर जखमी झाला आहे. आयशर गाडीवाला गाडी घेऊन पळाल्याचे समजते.

पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी तातडीने पथक पाठवले. परिसरातील नागरिकांच्या मदतीने जखमीला उपचारासाठी आणि मृतांचे शव विच्छेदनसाठी ग्रामीण रुग्णालयात रवाना केले आहे. दरम्यान या अपघातामुळे परिसरात शोककळा पसरली असून तिहेरी अपघातामुळे दोन जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.